अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी निश्चित केलेल्या नमुना आराखडा (Type Plan ) प्रमाणे बांधकाम खर्चाची वित्तीय मर्यादा वाढविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- एबावि-२०२१/प्र.क्र. १४२/ का-६**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- १४ फेब्रुवारी, २०२२.

वाचा :-

१. महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.एबावि-२००८/प्रक्र१७३/का-६, दि.१५.१.२०१०
२. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१८/प्र.क्र.७६/का-६, दि.११.१०.२०१८.
३. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१८/प्र.क्र.७६/का-६, दि.२९.१२.२०१८.

प्रस्तावाना :-

महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाड्या कार्यान्वित आहेत. शासनाच्या विविध योजनांतर्गत अंगणवाडी बांधकामासाठी निधी उपलब्ध होत असतो. अंगणवाडी केंद्राच्या इमारत बांधकामासाठी संदर्भाधिन क्रमांक १ येथील दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयानुसार नमुना आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामाकरीता संदर्भाधिन क्र.२ येथील दि.११.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये बिगर आदिवासी क्षेत्रासाठी प्रति अंगणवाडी केंद्र बांधकामाकरीता रुपये ८.५० लाख व आदिवासी क्षेत्रासाठी रुपये ९.४० लाख इतका दर मंजूर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे संदर्भाधिन क्र.३ येथील दि.२९.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये नक्षलग्रस्त व अन्य भागासाठी सदर मर्यादेमध्ये आणखी वाढ करण्यास मंजूर देण्यात आली आहे.

२. अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामाकरीता नमुना आराखडयानुसार बांधकाम करणे शक्य होत नसल्याने नविन राज्यदर सूची विचारात घेऊन अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम खर्चाच्या रकमेमध्ये वाढ करण्याबाबत जिल्हास्तरावरुन मागणी होत आहे. त्यास अनुसरुन अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम खर्चाच्या प्रचलित दरामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

संदर्भाधिन क्र.१ येथील दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या नमूना आराखडयानुसार अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामाकरीता सध्याच्या प्रचलित दरांबाबतचे संदर्भाधिन क्र.२ येथील दि.११.१०.२०१८ व संदर्भाधिन क्र.३ येथील दि.२९.१२.२०१८ रोजीचे शासन निर्णय अधिक्रमित करुन खालील प्रमाणे सुधारीत दर निश्चित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| क्षेत्र | प्रति अंगणवाडी केंद्र बांधकाम दर |
|---|---|
| बिगर आदिवासी क्षेत्र | रु.११.२५ लक्ष (GST सह) |
| आदिवासी व डोंगराळ क्षेत्र | रु.१२.३० लक्ष (GST सह) |
| नक्षलग्रस्त | रु.१४.७५ लक्ष (GST सह) |

३.	वरीलप्रमाणे लागु करण्यात आलेले दर हे सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ३ वर्षाकरिता लागु रहातील. यापूर्वी मंजूरी दिलेल्या / अपूर्ण असलेली बांधकामे पुर्ण करण्यासाठी जुने दर लागू राहतील

४.	सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ११४/२०२१/इमा-२, दिनांक १६.०९.२०२१, नियोजन विभागाने अनौपाचारीक संदर्भ क्र.२४८/१४७२, दि.२९.११.२०२१ व वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.१५/ व्यय-६, दि.४.२.२०२२ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२२०२१४१७१३२९६९३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( महेश वरुडकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री / मा. राज्यमंत्री (महिला व बाल विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (ग्रामविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
७. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई.
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१०. सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी, ( महिला व बाल विकास ), जिल्हा परिषद.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग.
१३. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी) प्रकल्प.
१४. निवड नस्ती कार्या-६, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.